


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे अंक : ७८८. वा शुक्रवार दि. ३१ मे २०२४ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये




# जिल्हा रुग्णालयात भ्रष्टाचार अन् भानगडींचा महापूर...
## कनिष्ठांपासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत भ्रष्टाचाऱ्यांची रेलचेल


**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालय हे सामान्य जनतेला आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी आहे की, केवळ भ्रष्टाचार आणि भानगडी करण्यासाठी आहे, असा प्रश्न आज अनेकांना सतावत आहे. बुलडाणा जिल्हा रुग्णालय सध्या भ्रष्टाचाराच्या गटारगंगेत आकंठ बुडालेले आहे. कुणाचे खेटर कुणाच्या पायात नाही. भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांना वाचवण्याचे काम दिवसरात्र वरिष्ठ अधिकारी करीत आहेत. सध्याची एकंदर स्थिती पाहता जिल्हा रुग्णालयाला कोणीही वाली उरलेला नाही, अशी स्थिती दिसून येत आहे.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन गेल्या अनेक महिन्यांपासून जिल्हा रुग्णालयात ठायी-ठायी बोकाळलेल्या भ्रष्टाचाराची गाथा जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम अत्यंत निष्ठेने व प्रामाणिकपणे करीत आहे. परंतु जिल्हा रुग्णालयात बसलेले अधिकारी हे इतके ढिम्म आहेत की, त्यांच्या कानापर्यंत कशाचाही आवाज जात नाही. भ्रष्टाचाराने सर्वच अधिकाऱ्यांना आंधळे, मुके आणि बहिरे करून टाकले आहे. त्यामुळेच दिव्याखाली अंधार या उक्तीप्रमाणे त्यांच्या अखत्यारित होत असलेल्या भ्रष्टाचाराची प्रकरणे त्यांना दिसत नाही. एक तर हे अधिकारी या संपूर्ण भ्रष्टाचारात सामिल आहेत किंवा ते इतके ढिसाळ आहेत की, त्यांना याकडे पहायला वेळ मिळत नाही ही स्थिती आहे.

**पोस्टमार्टम १५**

कोरोना महामारीच्या काळात जिल्हा रुग्णालयात साहित्य व उपकरणांच्या खरेदीत जो काही भ्रष्टाचार झाला, तो तर संपूर्ण राज्यभर गाजत आहे. अगदी विधानसभेपासून ते बुलढाणा शहरातील गल्लीपर्यंत त्याची चर्चा मोठ्या प्रमाणात आहे. या प्रकरणावर योग्य ती चौकशी व कारवाई होत नाही तोच २३ कोटी रुपयांचा घोटाळा देखील समोर आला. याशिवाय कॅशबुकातील खाडाखोड करून केलेला भ्रष्टाचार, भांडार विभागातील भ्रष्टाचार हा तर निरंतरपणे सुरू आहे. या एकाही भ्रष्टाचारात कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. केवळ चौकशांचा फार्स करण्यात आला. चौकशी समितीच्या सदस्यांनी बुलढाणा शहरात पर्यटन केले आणि नंतर सर्व काही थंडबस्त्यात यामध्ये आता आणखी एका भ्रष्टाचाराची भर पडली आहे. वीजतंत्री अंभोरे हे अक्षरश: अजीर्ण होऊन ओकेस्तोवर भ्रष्टाचार करीत आहे. अंभोर नामक हा धार्मिक माणूस एव्हढा राजरोस-पणे भ्रष्टाचार करीत आहे की,या भ्रष्टाचारासाठी तो दुसऱ्या अधिकाऱ्यांच्या कामकाजातही हस्तक्षेप करीत आहे. मात्र त्यावर कोणीही कारवाई करण्यास तयार नाही. अंभोरे हे भ्रष्टाचारामुळे आता एव्हढे मस्तवाल आणि मुजोर झालेत की ते वैद्यकीय विभाग पदाचा पदभार घेण्यासाठी वाट्टेल त्या थराला जात आहेत. अंभोरे यांची कृष्णकृत्ये दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने समोर आणण्याचे काम करीत आहे. या संपूर्ण स्थितीवरून हे दिसून येते की, बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालय हे एकीकडे भानगडींचे केंद्र बनले आहे, तर दुसरीकडे भ्रष्टाचाराने या ठिकाणी मोठा कहर माजवला आहे. काहीही झाले, तरी सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन याविरोधात सातत्याने आवाज उठवण्याचे काम करीतच राहिल. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज भ्रष्टाचारविरोधात प्रचंड मोठा लढा लढण्यास केंव्हाच सज्ज झालेला आहे. जोपर्यंत जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई होत नाही, तोपर्यंत काहीही झाले तर आम्ही माघार घेणार नाही, हे निश्चित.

अजून बरेच काही पुढील भागात...




### रुग्णसेवा कमी तर मागील व सुरू भानगडीत जास्त मेवा ?

जिल्हा सामान्य रुग्णालयात नियमबाह्य डेपोटेशन अधिकाराचा गैरवापर करणाऱ्या त्या नेहमी चर्चित असणाऱ्या अधिकाऱ्यांवर आरोग्य विभाग ठोस कारवाई करत नाही. आमचा हा पोस्टमार्टम सत्र असाच सुरू राहणार भ्रष्टचाराचार करून शासनाला लावलेल्या करोडो रुपयाला चुना नवनवीन प्रकरणे कर्मचाऱ्यांच्या अंतर्गत वादा मुळे चार भिंती बाहेर तत्कालीन जिल्हाशल्य चिकित्सक व भांडारपाल सह संबंधित आधिकाऱ्यांचा पुढील सत्रात पडदाफाश व अर्थपूर्ण कुंभकर्णी झोपेत असलेले आरोग्य विभागाला आम्ही बातमीपत्रातून जाग करून दोषींकडून व्याजासह वसुली व कारवाई होईपर्यंत पाठपुरावा करत राहू

# महिलेचे अर्धवट जळलेले प्रेत आढळले

**जनसंचलन/सिंदखेडराजा**

तालुक्यातील सिंदखेडराजा ते मेहकर राज्यमहामार्गावरील पिंपळगाव लेंडी शिवारात एका अनोळखी युवतीचे प्रेत आज ३० मे गुरुवारी सकाळी आढळून आलेआहे. २०ते २५ वर्षे वयाच्या युवतीला जाळण्याचा प्रयत्न झाल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत किनगावराजा पोलिसांनी पंचनामा करून अज्ञात आरोपीविरूद्ध खूनाचा गुन्हा दाखल केला असून प्रेत उत्तरीय तपासणीसाठी बुलढाणा येथे पाठवले आहे. तालुक्यातील सिंदखेडराजा मेहकर राज्य महामार्गावरील पिंपळगाव लेंडी येथील द्वारका सुभाष गायके यांच्या गट नं. १५२ शिवारात बंद पडलेले धाबावजा पडीक हॉटेल आहे. आज सकाळी त्याच्या हॉटेल मागील बाजूसएका अनोळखी युव-तीचे प्रेत असल्याचे अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल आढळून आले. कुणीतरी ते बघितले व त्याची चर्चा पंचक्रोशीत पस-रली. त्यावरुन शेलगाव राऊत येथील पो-लीस पाटील राहुल बाबुराव चव्हाण ह्यांनी किनगावराजा पोलीस ठाण्याला ही माहिती दिली. त्यावरून पोलिसांनी तात्काळ घटनास्थळ गाठले. तेथे एक अंदाजे २० ते २५ वर्षे वयाच्या अनोळखी युवतीचे छातीजवळ अर्धवट जळलेल्या अवस-थेतील प्रेत आढळले. त्याचे पोलिसांनी निरीक्षण केले असता, ह्या युवतीला अज्ञात कारणावरुन मारहाण केलेले तसेच गळा, डोके, डोळ्याच्या व कानाच्या वरच्या बाजूस तीक्ष्ण हत्याराने वार करुन व डाव्या पायाची बोटे कापून ठार मारले असल्याचे दिसून आले तसेच ओळख पटू नये म्हणून अर्धवट जाळून पुरावा नष्ट केल्याचे निष्पन्न झाले. यासंदर्भात किनगावराजा पोलिसांनी शेलगाव राऊतचे



पोलीस पाटील राहुल चव्हाण यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध खून करून पुरावा नष्ट करणे प्रकरणी कलम ३०२, २०१ भादंवि नुसार गुन्हा दाखल केला आहे. घटनास्थळी अतिरिक्त पोलीस अधिक्षक बाबुराव महामुने, उपविभागीय पोलिस अधिकारी मनीषा कदम यांचेसह सिंदखेडराजा, अंढेरा, बीबी येथील ठाणेदार व कर्मचाऱ्यांनी भेट देऊन मार्गदर्शन व मदत केली. श्वान पथक व ठसे तज्ञांना सुद्धा पाचारण करण्यात आले होते. घटनेचा तपास ठाणेदार विशाल नरवाडे, पोकॉं सुभाष गिते, सोनपसारेसह सहकारी करीत आहेत.

# फिरते पथकाची धडाकेबाज कारवाई...

**जनसचंलन/ सिंदखेडराजा**

महसूल विभागाच्या गौण खनिज प्रतिबंधक पथकाने काल दि. २८ मे, मंगळवारी रात्री तालुक्यातील उमरद येथे अवैध रेती वाहतूक करणारे टिप्पर पकडून किनगावराजा पो-लीस ठाण्यात जमा केले आहे. मंडळाधिकारी एस. एस. म्हस्के यांच्या नेतृत्वाखालील गौण खनिज प्रतिबंधक पथक कर्मचारी तलाठी श्रीमंत पाठव,जि.एस टेकाळे,आर एस देशमुख,आर एस लांडगे, व्हि यु कुहीरे, यांनी दि. २८ मे, मंगळवारी सायंकाळपासून गस्त घालत असतांना उमरद येथे अवैध रेती वाह-तूक करणारे टिप्पर येणार असल्याची गुप्त खबर त्यांना प्राप्त झाली. त्या दृष्टीने पथकाने उमरद येथे सा-पळा लावला. रात्री ११.२५ वा. चार



ब्रास रेती वाहतूक करणारे टिप्पर क्र. एम. एच. २८ बी.बी. ७४२६ हे तेथे पोहोचले. टिप्पर मालक समाधान नारायण मोरे, रा. ताडशिवणी, ता. सिंदखेडराजा याचे जवळ रेती वाह-तूक करण्यासाठी लागणारी कागदपत्रे नसल्याने पथकाने पंचनामा करून टिप्पर ताब्यात घेतले. तेथून टिप्पर किनगावराजा पोलीस ठाण्यात नेऊन सकाळी १.१९ वा. अटकाव बाबत नोंद करण्यात आली आहे.

## मोटारसायकल अपघातात कोलारा येथील युवक ठार

**जनसंचलन/ चिखली**

किशोर मधुकर सोळंकी या युवकांचा २९ मे च्या सकाळी जाफ्राबाद तालुक्यातील वरूड समोर गोपी सवासणी व खासगांव जवळील वनविभागाच्या हद्दीत रस्त्याच्या एका वळणावर गड्डयामध्ये मोटरसायकलसह पडून मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना घडल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केल्या जात आहे याबाबत सविस्तर असे की चिखली तालुक्यातील कोलारा येथील किशोर मधुकर सोळंकी हा घरातील करता युवक २८ मे रोजी चिखली येथील एका मंगल कार्यालयामध्ये सकाळपर्यंत मित्राच्या लग्नामध्ये सहभागी झाला होता. एका खासगी कंपनीत कामाला असलेला किशोर लग्नावरून ३० मे च्या सकाळी घरी आला व तसाच सकाळी मोटरसायकलने त्याचे कार्यक्षेत्र असलेल्या जाफराबाद कडे जाता झाला दरम्यान सायंकाळी पाच वाजेपर्यंत त्यांच्या मोबाईलची रिंगटोन वाजत होती मात्र तो मोबाईल उचलत नसल्याने घरची मंडळी तसेच ऑफिसकडील मंडळी सुद्धा परेशान झाली होती नेमका किशोर गेला कुठे हे कळत नसल्याने अखेर जाफराबाद पोलीस स्टेशनची संपर्क साधल्यानंतर त्याचा मोबाईल वरून लोकेशन ट्रॅक झाला आणि तो वरूड समोर गोपी सवासणी व खासगांव जवळील वनविभागाच्या हद्दीत रोड असलेल्या लगत एका वळणावरील असलेल्या खढ्यामध्ये त्याची मोटर सायकल आणि तो मूर्त अवस्थेत आढळून आला त्याला शोधण्यात सायंकाळचे सहा वाजले होते त्याच्या मृतदेहावर ३० मे रोजी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. किशोर हा आई-वडिलाला एकुलता एक मुलगा होता त्याच्या पक्षात आई, वडील, तीन बहिणी, पत्नी, एक मुलगी बराच मोठा परिवार आहे.

## चिखली येथील भगत श्री रुग्णालय हॉस्पिटल मधील डॉक्टरांनी एका महिलेचे वाचविले प्राण...

**जनसंचलन/ चिखली**

चिखली येथील भगत श्री रुग्णालय हॉस्पिटल मधील डॉक्टरांनी एका अवघड शास्त्रीयकेद्वारे एका महिलेचे प्राण वाचविण्यात यश मिळविले आहे भगत श्री रुग्णालयाची हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी एका महिलेच्या पोटातून गर्भ पिशीवीच्या दोन किलोचा मासाचा गोळा काढला आहे या ऑपरेशन प्रचंड अवघड होती व ऑपरेशनसाठी डॉक्टरांच्या पथकाला दोन तास लागली या महिलेच्या पोटातील एवढा मोठा गर्भ पिवशीचा दोन किलोचा गोळा निघाल्यानंतर तिला आता हायसे वाटत असून तिने डॉक्टरांचे आभार मानले आहे या संदर्भात मिळालेल्या माहितीनुसार ही महिला रुग्ण चिखली येथील रहिवासी असून तिचे वय ४५ वर्ष इतके आहे गेल्या सहा महिन्यात या महिलेला पोट दुखीचा त्रास सुरू असल्याने तिने खाजगी रुग्णालयात न जाता सरकारी रुग्णालयात दाखविली या महिलेने अनेक दिवस हा त्रास सहन केला वेदना सहन करण्या पलीकडे गेल्यानंतर तिने चिखलीतील भगत श्री रुग्णालय चिखली येथे उपचार सुरू केली या महिलेची तपासणी केली तेव्हा गर्भ पियुषीचा भला मोठा दोन किलोचा महासाचा गोळा असल्याचे दिसले मार्शल गोळा होता हॉस्पिटलचे सर्जन डॉक्टर दीपक भगत आणि अतिरिक्त शल्य चिकित्सक डॉक्टर यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी सकाळी महिलेच्या ऑपरेशन करण्यात आले तेव्हा तिच्या पोटातून तब्बल



गर्भ पियुषी चा दोन किलोचा मासाचा गोळा निघाला या ऑपरेशनला श्री रोग तज्ञ डॉक्टर दीपक भगत यांनी यशस्वीपणे ऑपरेशन केली त्यामुळे या महिलेला नवे जीवन मिळाले आहे

## नात्याला काळिमा फसाणारी दुर्दैवी घटना

### मावस बहिणीवर भावाने केला अत्याचार आरोपीस दहा वर्षे कारावास जिल्हा व सत्र न्यायालयाचा निर्णय

**जनसंचलन/बुलढाणा**

लग्नाचे आमीष दाखवून मावस बहीणीस पळवून नेवून अत्याचार करणाऱ्या आरोपी मावस भावाला जिल्हा व सत्र न्यायालयाने दहा वर्षाच्या सश्रम कारावासाची शिक्षा व पाच हजार रुपये दंड ठोठावला. अंढेरा पोलिस स्टेशनच्या हद्दीतील एका गावातील १६ वर्षीय मुलीस आरोपी मावस भावाने लग्नाचे आमीष दाखवनू पळवून नेले होते. या प्रकरणी मुलीच्या वडीलांनी दिलेल्या फिर्यादीवरून मावस भावाविरूध्द पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक प्रकाश मुंढे यांनी करून दोषारोप-पत्र बुलढाणा येथील विशेष न्यायालयात दाखल केले होते विशेष सरकारी वकील ॲड. संतोष खत्री यांनी या प्रकरणी सरकारी पक्षाची बाजु मांडली सरकारी पक्षाकडून १० साक्षीदार तपासण्यात आले. पीडित मुलगी आणि तिची आई फितूर झाली होती तरीही त्यांच्या उलट तपासात आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध होईल इतपत पुरावा मिळाला. त्यामुळे, जिल्हा व सत्र न्यायाधीश




आर. एन. मेहरे यांनी आरोपी मावस भावास दहा वर्षांचा सश्रम करावासाची शिक्षा सुनावली आहे.

## आयशरची दुचाकीला धडक जि.प. शाळेच्या लिपिकाचा घटनास्थळी मृत्यू




**जनसंचलन/ नांदुरा**

मलकापूरकडून खामगाव कडे भरधाव वेगात जाणाऱ्या आयशरने एका दुचाकीला जबर धडक दिल्याने या अपघातात दुचाकीस्वाराचा घटनास्थळीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना २९ मे रोजी पावणेबाराच्या सुमारास डागा पेट्रोल पंपाच्या पुढे नांदुरा बायपास वर घडली. प्रदीप दत्तात्रय कुळकर्णी वय ५२ रा. काशी नगर सुटाळा खुर्द, खामगाव असे मृतकाचे नाव असून ते पिंपळगाव काळे येथे जि. प. शाळेवर लिपीक म्हणून कार्यरत होते. या प्रकरणी पोलिसांनी आयशर चालकास ताब्यात घेऊन त्याचे विरूद्ध गुन्हा दाखल केला आहे. या बाबत प्राप्त माहितीनुसार, खामगाव येथील सुटाळा खुर्द, काशी नगर येथे राहणारे प्रदिप दत्तात्रय कुळकर्णी वय ५२ हे २९ मे रोजी पिंपळगाव काळे येथे शाळेवर जाण्यासाठी त्यांच्या होंडा ड्रीम युगा या दुचाकी क्र. एम एच २८ - ऐ एच ५२७२ ने निघाले होते. दरम्यान मृतक प्रदीप कुळकर्णी शहराबाहेर असलेल्या डागा पेट्रोल पंपाच्या पुढे नांदुरा बायपास वर त्यांच्या दुचाकीला मलकापूर कडुन खामगाव कडे भरधाव वेगात जाणाऱ्या आयशरने ( क्र. सी. जी. ०४ एन व्हि ६४२३ ) जबर धडक दिल्याने या अपघातात प्रदिप कुळकर्णी यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच ठाणेदार विलास पाटील, वाहतूक विभागाचे सुनिल सुशीर यांनी घटनास्थळी धाव घेऊन आयशर चालकास ताब्यात घेतले. तसेच प्रदिप कुळकर्णी यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी नांदुरा प्राथमिक आरोग्य केंद्रात आणला. घटनास्थळ हे जलंब पोलिस ठाण्याच्या कार्य कक्षेत येत असल्याने पुढील कार्यवाहीसाठी जलंब पोलिसांना माहिती दिली. या प्रकरणी मृतक प्रदिप कुळकर्णी यांचे मामा रमेश यशवंत तळणीकर वय ६६ रा. बालाजी नगर, बुलढाणा यांनी जलंब पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर जलंब पोलिसांनी आरोपी आयशर चालका विरोधात कलम ३०४ अ. २७९, ४२७ भादविचा गुन्हा दाखल केला असून या प्रकरणाचा पुढील तपास ऐ एस आय दिनकर तिडके हे करीत आहेत.

## अल्पवयीन मुलींचा छळ आरोपीस केली अटक

**जनसंचलन/मोताळा**

चौथ्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या दोन अल्पवयीन विद्यार्थिनींचा दि. ३ एप्रिल रोजी लैंगिक - छळ करून पसार झालेल्या शिक्षकास तब्बल पावणे दोन महिन्यानंतर बुधवारी, दि. २९ बोराखेडी पोलिसांनी - अटक केली आहे. दरम्यान, त्याला - न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला एका दिवसाची पोलिस आहे. कोठडी सुनावली पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एका जिल्हा परिषदच्या - शाळेत शिक्षक असलेल्या दिलीप मोतीराम जाधव या शिक्षकाने ३ एप्रिल रोजी सकाळी त्यांच्याच वर्गात शिक्षण घेत असलेल्या दोन अल्पवयीन विद्यार्थिनींच्या लैंगिक छळ केल्याचा आरोप करीत तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. घटनेनंतर सदर शिक्षक पसार झाला होता. दरम्यान, त्यांनी अटकपूर्व जामिनासाठी



न्यायालयात धाव घेतली होती. परंतु न्यायालयाने अटकपूर्व जामीन फेटाळला. त्यानंतर तब्बल पावणे दोन महिन्यानंतर बोराखेडी पोलिसांनी त्या शिक्षकास ताब्यात घेत न्यायालयात हजर केले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# ग्रामपंचायत आपल्या दारी या अभियानास जामठी येथे प्रारंभ...

## अभियानाचा पहिला टप्पा संपन्न...

**जनसंचलन/ जामठी**

जामठी येथे शासनाच्या विविध योजनांचा गरजू लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी तसेच प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक, कार्यक्षम आणि गतिमान होण्यासाठी जामठी शेकापूर गट ग्रामपंचायतच्या वतीने जामठी येथे ग्रामपंचायत आपल्या दारीफ या अभिनव उपक्रमाची सुरुवात स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज व भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. ग्रामपंचायत आपल्या दारीफ हा उपक्रम जामठी येथे राबविण्याची अभिनव संकल्पना बुलढाणा जिल्हा राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य श्री.मनोजभाऊ दांडगे यांनी मांडली आहे.काल (ता.२९) रोजी या उपक्रमाचा पहीला टप्पा संपन्न झाला आहे.. ग्रामपंचायत आपल्या दारीफ हा उपक्रम राबविण्यात यावा आणि या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामसेवक, तलाठी यांनी ग्रामस्थांच्या थेट घरापर्यंत जाऊन ग्रामस्थांच्या समस्या जाणून घ्याव्या.. त्या समस्या सोडविण्यावर भर असू द्यावा. असे आवाहन श्री.मनोजभाऊ दांडगे यांनी केले आहे. शासनाच्या वेगवेगळ्या योजनांचा गरजूंना लाभ मिळवून देण्यासाठी तसेच प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक, कार्यक्षम आणि गतिमान होण्यासाठी सुरू केलेल्या या ङ्गग्रामपंचायत आपल्या दारीफ अभियानास नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.. शासनाच्या वतीने गावच्या विकासासाठी विविध योजनांतर्गत ग्रामपंचायतला थेट निधी दिला जातो. गावातील अनेक लोकांना शासनाच्या योजनांची माहिती नसते. माहिती अभावी या योजनांचा लाभ गरजू लोकांना मिळत नाही. शासनाच्या वैयक्तिक लाभाच्या व गाव विकासाच्या विविध योजना गावकर्यांपर्यंत पोहोचवून गरजूंना त्याचा लाभ देण्यासाठी तसेच ग्रामस्थांच्या समस्या व अडीअडचणी जाणून घेण्यासाठी ङ्गग्रामपंचायत आपल्या दारीफ हा उपक्रम राबविल्यास ग्रामस्थांना नक्कीच त्याचा फायदा होईल.



गावकर्यांना पाणी, रस्ते, पथदिवे, स्वच्छता, सांडपाणी व कचरा व्यवस्थापन आदी प्रश्न सोडविण्यासाठी तसेच रहिवासी,जन्म-मृत्यू नोंद व इतर विविध प्रकारचे दाखले मिळवण्यासाठी व अन्य कामांसाठी ग्रामपंचायत कार्यालयात हेलपाटे घालावे लागतात. विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी पाठपुरावा करावा लागतो. ङ्गग्रामपंचायत आपल्या दारीफ उपक्रमाच्या माध्यमातून सरपंच,उपसरपंच,ग्रामसेवक,तलाठी व ग्रामपंचायतचे कर्मचारी यांनी प्रत्यक्ष गावकर्यांपर्यंत जाऊन त्यांचे प्रश्न व समस्या जाणून घेऊन लगेचच मार्गी लावल्या.तर गावकर्यांचे श्रम, पैसा आणि वेळेची बचत होईल. गावकर्यांचे प्रश्न त्वरित सुटले तर त्यांना मोठा दिलासा मिळू शकेल.यासाठी या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# महिलेच्या पर्समधून सोन्याचे गंठण लंपास



**जनसंचलन/ देऊळगांव राजा**

बस मध्ये चढत असलेल्या महिलेच्या पर्समधून सोन्याचे गंठण (पोत) अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना शहरातील बसस्थानकामध्ये घडली. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जालना जिल्ह्यातील प्रवासी अलकनंदा गजानन बोबडे (वय ३०, रा. पापळ, ता. जाफ्राबाद, जि. जालना) या देऊळगांव राजा बसस्थानकावरून शिर्डी-कारंजा बसमध्ये चढत होत्या. यावेळी त्यांच्या पर्समधील सोन्याचे गंठण (पोत) वजन ३० ग्रॅम किंमत ३० हजार १६५ रुपये अज्ञात चोरट्याने लंपास केले. अलकानंदा बोबडे यांच्या पर्समध्ये सोन्याचे गंठण (पोत) नसल्यामुळे चोरीस गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. याबाबत त्यांनी पोलिस स्टेशनला फिर्याद दिली असून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास ठाणेदार संतोष महल्ले यांच्या मार्गदर्शनात पोकॉं. विनोद गवई हे करीत आहेत.

# शिक्षण संस्था सचिवास शिवीगाळ आरोपीस शिक्षेसह पाच हजारांचा दंड




**जनसंचलन/जळगाव जा.**

विश्वमंदिर एज्युकेशन सोसायटीचे सचिव ॲड. एस. वाय. खिरोडकर यांना शिवीगाळ केल्याप्रकरणी येथील दिवाणी न्यायाधीश तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग सी. एम. खारकर यांनी आरोपी साहेबराव जानराव वाघ यास कलम २९४ नुसार कोर्ट उठेपर्यंत शिक्षा व पाच हजार रुपये दंड, दंड न भरल्यास दहा दिवसांची साधी कैद अशी शिक्षा २९ मे रोजी ठोठावली. १९ मार्च २०१९ रोजी आरोपी साहेबराव वाघ विश्वमंदिर एज्युकेशन सोसायटीच्या अंतर्गत चालणाऱ्या महात्मा जोतिबा फुले प्राथमिक शाळेच्या कार्यालयात मुख्याध्यापक यांना अर्ज देण्याकरिता आला होता. मुख्याध्यापक हजर नसल्याने प्रभारी मुख्याध्यापक जी. के. वाघ यांनी तो अर्ज आपल्याजवळ द्यावा, असे म्हटले. यावेळी विश्व मंदिर एज्युकेशन सोसायटीचे सचिव ॲड. एस. वाय. खिरोडकर हे विद्यालयात आले होते. यावेळी साहेबराव वाघ याने त्यांना शिवीगाळ केली. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले. न्यायालयात प्राथमिक शाळेच सहायक शिक्षक जी. के. वाघ व मुख्याध्यापक व्ही. टी. भारसाकडे यांची साक्ष नोंदवण्यात आली. दोन्ह बाजूंचा युक्तीवाद ऐकून न्यायालयाने आरोपी साहेबराव जानराव वाघ याल कोर्ट उठेपर्यंत शिक्षा व पाच हजान रुपये दंड, दंड न भरल्यास दह दिवसांची साधी कैद, अशी शिक्ष ठोठावली.

# महिला सरपंच चाटे यांचा महसूल विभागाला निर्वाणीचा इशारा...

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

महसूल विभागाकडे वारंवार मागणी केल्यानंतरही महसूल विभागाने सिंदखेडराजा तालुक्यातील निमगाव वायाळ येथील खडकपूर्णा नदीतील रेतीघाटाचे तांत्रिक मोजमाप केले नाही. त्यामुळे निमगाव वायाळ येथील सरपंच शिलाबाई रामेश्वर चाटे यांनी आत्मदहनाचे अस्त्र उपसले होते. या रेतीघाटीचे तांत्रिक मोजमाप करुन सी.सी.टी.व्ही. फुटेज देण्यात यावेत तसेच दोषी अधिकारी व रेतीतस्करांवर कारवाई करावी अन्यथा २७ मे रोजी या रेतीघाटावर आत्मदहन करणार असा इशारा चाटे यांनी दिला होता. मात्र त्यानंतर महसूल विभागाने दिलेल्या लेखी आश्वासनामुळे सरपंच चाटे यांनी आत्मदहन आंदोलन स्थगित केले होते. दिनांक १ जूनपर्यंत सदर रेतीघाटाचे तांत्रिक मोजमाप करु असे लेखी पत्र महसूल विभागाने चाटे यांना दिले होते. मात्र महसूल विभागातील अधिकाऱ्यांच्या कार्यप्रणालीची चांगलीच जाण असल्यामुळे सरपंच चाटेही मागे हटणार व्यक्तीमत्व नव्हतं! त्यांनी महसूल विभागाला खरमरीत इशारेवजा पत्र देऊन महसूल विभागाची चांगलीच कोंडी केली आहे. महसूल विभाग प्रत्येक वेळेस केवळ पत्र देण्याचे नाटक करुन वेळ मारुन नेत असल्याचा अनुभव पाठीशी असल्यामुळे सरपंच चाटेसुध्दा अधिकच आक्रमक होतांना दिसत आहे. सदर रेतीघाटाचे तांत्रिक मोजमाप करुन तसा अहवाल १ जून २०२४ च्या संध्याकाळपर्यंत सादर



न केल्यास महसूल विभागाला कोणतीही पूर्वसूचना न देता मी २ जून २०२४ रोजी ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणी आत्मदहन करेल व याची सर्वस्वी जबाबदारी ही महसूल विभागाची राहील असा गंभीर व निर्वाणीचा इशारा दिला. सरपंच चाटे यांच्या या अल्टिमेटममुळे आतापर्यंत रेतीतस्करांना अभय देणाऱ्या व दोषी अधिकाऱ्यांना वाचविणाऱ्या महसूलच्या जबाबदार अधिकाऱ्यांची चांगलीच गोची झाली आहे.

# बँकांची १४,५९५ कोटींनी फसवणूक,सर्वसामान्यांनी ठेवलेली रक्कम...

वृत्तसंस्था/नागपूर

केंद्र सरकार बँकांची फसवणूक होऊ नये म्हणून विविध उपाययोजना केल्याचा दावा करते. परंतु, वर्ष २०२३-२४ या काळात देशातील ६३ बँकांची तब्बल १४ हजार ५९५.५७ कोटी रुपयांनी फसवणूक झाली. त्यापैकी केवळ ७५३.८९ कोटी रुपयांची वसुली झाल्याचा धक्कादायक प्रकार माहिती अधिकारातून पुढे आला आहे. भारतीय रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या (आरबीआय) अखत्यारित देशातील सर्व राष्ट्रीयीकृत व सहकारी बँका येतात. त्यापैकी विविध ६३ बँकांची ३ लाख ४६ हजार ५९ नागरिकांकडून तब्बल १४ हजार ५९५.५७ कोटी रुपयांनी फसवणूक झाली. तर एकूण फसवणुकीपैकी केवळ ७५३.८९ कोटी रुपयांची वसुली करण्यात या बँकांना यश मिळाल्याचे माहिती अधिकारातून सामाजिक कार्यकर्ते अभय कोलारकर यांनी पुढे आणले. फसवणुकीतील परत मिळालेली रक्कम एकूण फसवणुकीच्या तुलनेत केवळ ५.१६ टक्केच आहे. त्यामुळे सर्वसामान्यांनी बँकेत ठेवलेली इतर ९५ टक्के रक्कम कधी वसूल होणार? हा प्रश्न या क्षेत्रातील जाणकार उपस्थित करत आहे. अभय कोलारकर यांनी माहिती अधिकारात आरबीआयला या प्रकरणांपैकी काहींमध्ये किती बँक कर्मचारी सहभागी असल्याबाबतही विचारले होते. परंतु, २०२३- २४ या वर्षातील माहिती उपलब्ध नसल्याचे आरबीआयचे केंद्रीय सार्वजनिक माहिती अधिकारी विनोद कुमार यांनी कोलारकर यांना लेखी कळवले आहे.भारतीय रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या अखत्यारित असलेल्या देशभरातील बँकांमध्ये वर्ष २०२१ मध्ये १४ लाख ९० हजार ९३९ कर्मचारी कार्यरत होते. ही संख्या २०२२ मध्ये १५ लाख ३० हजार ८१० कर्मचारी तर २०२३ मध्ये १६ लाख ७९ हजार ५५ कर्मचारी असल्याचेही माहितीच्या अधिकारातून पुढे आले.प्रत्येकाने इंटरनेटवरून माहिती घेताना ऑनलाईन माहितीचे संकेतस्थळ, व्यवहार, विक्रेत्याची सत्यता तपासायला हवी. सुरक्षित पेमेंट पद्धती वापरावी. अज्ञात लिंक किंवा पॉप- अपवर क्लिक करणे टाळावे. मजबूत पासवर्ड वापरावे. वारंवार स्वत:चे पासवर्ड बदलावे. अनपेक्षित ईमेल किंवा कॉल प्राप्त करताना सावधगिरी बाळगावी. अज्ञात क्रमांकावर कोणतेही व्यवहार करू नये. नवीनतम सुरक्षा सॉफ्टवेअरसह तुमचा संगणक आणि मोबाइल डिव्हाइस अद्यावत ठेवायला हवा. बँकेतील व्यवहार आणि केडिट कार्ड स्टेटमेंट वारंवार तपासायला हवे.




# सहा महिन्यांनी राजकीय भूकंप होणार, नरेंद्र मोदींचं मोठं वक्तव्य...

वृत्तसंस्था/ पश्चिम बंगाल

तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांकडे सापडलेल्या नोटांच्या डोंगराचा प्रत्येक रुपयाचा हिशोब दिला जाईल. ज्यांच्याकडून पैसे लुटले गेले त्यांना मी आतापर्यंत सुमारे १७,००० कोटी रुपये परत केले आहेत. बंगालमध्येही तुमचा लुटलेला पैसा परत मिळवण्यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे, असं नरेंद्र मोदी म्हणाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी पश्चिम बंगालमध्ये प्रचार केला. बारासात, उत्तर २४-परगणा येथे एका सभेला संबोधित करताना ते असं म्हणाले आहेत. तसेच ममता बॅनर्जी यांच्यावरही निशाणा साधला आहे.पंतप्रधान मोदी म्हणाले की, मी गेल्या दोन महिन्यांत पश्चिम बंगालमधील अनेक शहरांमध्ये गेलो आहे, मला सतत दिसत आहे की यावेळी टीएमसी आणि भारतीय लोकांचे मोठे किल्ले उद्ध्वस्त होणार आहेत. ४ जून रोजी संपूर्ण बंगालमध्ये मोठ्या प्रमाणात कमळ फुलणार आहे. तुमचं एक मत देशाची दिशा बदलू शकतं. ४ जून रोजी लोकसभा निवडणुकीचा निकाल लागेल आणि त्यानंतर सहा महिन्यांनी देशात एक मोठा राजकीय भूकंप होईल. घराणेशाहीचं राजकारण घेऊन पुढे चाललेले अनेक पक्ष नष्ट होतील.ते म्हणाले की, या निवडणुकीचे नेतृत्व देशातील जनता करत आहे, कारण याच जनतेने १० वर्षांचा विकासाचा प्रवास पाहिला आणि ६० वर्षांचे दु:खही पाहिले. देशातील कोट्यवधी गरीब जनता जीवनाच्या मूलभूत सुविधांपासून वंचित होती. भारतासारख्या देशात उपासमारीच्या बातम्या सर्रास येत होत्या. १८ हजारांहून अधिक गावांमध्ये पिण्यासाठी पाणी नाही, वीज नाही. सुधारणांसाठी चर्चा झाली नाही हे सर्वात मोठे दुर्दैव. घराणेशाहीच्या राजकारणाने करोडो तरुणांच्या स्वप्नांचा बळी घेतला. टीएमसीच्या विजयामुळे या भागातील लाखो मच्छिमारांचे मोठे नुकसान होत आहे. केंद्र सरकार मच्छीमार बंधू-भगिनींसाठी अनेक योजना राबवत आहे. आम्ही मच्छीमार आणि शेतकऱ्यांना फिशर क्रेडिट कार्ड सुविधा दिली. आम्ही एक मत्स्यपालन केंद्र दिले. बंगालमध्ये मत्स्यपालनाशी संबंधित केंद्रीय कायदे लागू करण्यास परवानगी देत नाही, असं नरेंद्र मोदी म्हणाले आहेत.



# वाढदिवसाला तलवारीनें केक कापल्यामुळे गुन्हा दाखल

जनसंचलन/बिबी

बिबी पोलीस स्टेशन हद्दीतील २८ मे रोजी खापरखेड घुले ता लोणार या गावातील वैभव प्रल्हाद घुले वय-२०वर्षे याचा वाढदिवस असल्याने त्याने आपल्या मित्रांना आमंत्रित करून गावात रोडवर मोटरसायकल वरं दे नाव लिहिलेले ४ केक तलवारीच्या साहाय्याने कापुन हातात तलवार घेऊन दहशत निर्माण केली. व धड्याक्यात वाढदिवस साजरा केला. मात्र त्याचे हेच कृत्य बीबी पोलिसांना समजताच २९ मे रोजी बीबी पोलीसांनी वैभव घुले यास ताब्यात घेऊन विचारपूस करत त्याच्याकडून ०१ तलवार जप्त केली व त्याला पोलीस स्टेशनमध्ये आणून त्याच्याविरुद्ध शस्त्र अधिनियम व महाराष्ट्र पोलीस अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदरची कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पो. स्टे बीबी चे ठाणेदार सपोनि संदिप पाटील, पोलीस अंमलदार अरुण सानप, यशवंत जैवाळ यांनी केली. अलीकडच्या काळात तरुणांमध्ये वाढदिवसाच्या निमित्ताने डी जे वाजविणे, तलवारीने केक कापणे असे कृत्य करून वाढदिवस साजरा करण्याचा प्रकार वाढत असून त्यातुन एखादा गंभीर गुन्हा घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पोलिसांकडून अशा कृत्यावर कारवाई करण्यात येत आहे. त्यामुळे वाढदिवसाला तलवारीने केक कापू नका, डी जे वाजवू नका, पोलिसांचे आपल्यावर लक्ष आहे. असेच बीबी पोलीसांच्या कारवाई वरून दिसून येते.

# महिलेचा विनयभंग करणाऱ्या बांधकाम ठेकेदारविरुध्द गुन्हा

जनसंचलन/ सोनाळा

येथील एका २३ वर्षीय विवाहित महिलेचा घरात घुसून बांधकाम ठेकेदाराने विनयभंग केल्याची घटना ३० मेच्यास. ९.३० वाजता घडली. महिलेच्या फिर्यादीवरून सोनाळा पोस्टे मध्ये अप नं १४५ /२४ कलम ३५४, ३५४ (ड) ४५१ भादंविनुसार गुन्हा दाखल केला आहे. विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव शेख रहेमत शे आमद ठेकेदार रा. सोनाळा असे आहे.

